| MHLA090014392022 | **म.सं.कौ.हिं. किरकोळ अर्ज क्र.१९/२०२२**<br>**स्वाती वि. कैलासपती व ईतर** |
|---|---|

**निशाणी ११ वर आदेश**

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ नुसार अंतरिम पोटगी मिळण्यासाठी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये अर्जदार क्र.१ व २ यांनी गैरअर्जदाराकडून दरमहा प्रत्येकी रुपये १०,०००/- इतकी अंतरिम पोटगी मंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. अर्जदार हिने तिच्या अर्जात असे कथन केले की, तिचे लग्न गैरअर्जदारासोबत दि.१३.०५.२०१३ रोजी मौजे वाढवणा (बु.), ता. उदगीर येथे त्यांच्या धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे अर्जदाराच्या वडीलांनी योग्य ते मानपान करुन लावून दिले. तिला लग्नामध्ये रु.११,००,०००/- रुपये वरदक्षीणा, ११ तोळे सोने व इतर संसारोपयोगी वस्तू दिल्या होत्या. तसेच लग्नापुर्वी शाल अंगठीच्या कार्यक्रमामध्ये वडिलांनी रु.३,००,०००/- खर्च केला होता.

३. गैरअर्जदाराने अर्जदाराला लग्नानंतर सहा महिणे चांगले नांदविले. त्यानंतर गैरअर्जदारांनी अर्जदाराला मानसिक व शारिरीक त्रास देण्यास सुरुवात केली. तसेच अर्जदाराचे पती शिक्षक म्हणुन नोकरीस आहेत. त्यांचे संचमान्यता अप्रोल निघालेले नाही. त्यांचे संचमान्यता अप्रोल काढण्यासाठी माहेरहून रु.१०,००,०००/- घेवून ये असे म्हणून छळ करु लागले. दरम्यानच्या काळात अर्जदार हीने मुलीस जन्म दिला. अर्जदाराने त्याबाबत तिच्या सासरी कळवले असता ते मुलीस पाहण्यास आले नाहीत. तसेच सासरचे लोक तिला नांदविण्यास घेऊन जाण्यास आले नसल्यामुळे अर्जदाराच्या वडिलांनी तिला सासरी नांदण्यास नेऊन सोडले. तसेच अर्जदाराला मुलगी झाल्यामुळे गैरअर्जदारांनी तिचा व तिच्या मुलीचा अपमान करण्यास व त्रास देण्यास सुरुवात केली.

४. अर्जदारांचे असेही कथन की, अर्जदाराकडे कसलेली उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे अर्जदार व तिच्या लहान मुलीला तत्काळ मदतीची अत्यंत गरज आहे.

अर्जदाराची मुलगी हि शिक्षण घेत असून तिच्या शिक्षणासाठी पैशाची अत्यंत आवश्यकता आहे. सध्या ती अर्जदारावर पूर्णपणे अवलंबून आहे. सबब, अर्जदाराने प्रस्तूत अर्जाद्वारे दरमहा प्रत्येकी रक्कम रु.१०,०००/– अंतरिम पोटगी मिळण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

५. अर्जदार हिच्या कथनानुसार, अर्जदार क्र.१ हा साधना हायस्कुल देगलूरयेथे माध्यमिक शिक्षक म्हणून नोकरीस आहे. त्यास दरमहा ६० हजार रुपये पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार क्र.१ हा खाजगी शिकवणी घेतो. त्यापासुन तो दरमहा ३० ते ४० हजार रुपये उत्पन्न मिळवितो. तसेच गैरअर्जदार क्र.१ यांच्या कुटुंबाची मौजे सुगाव ता. मुखेड येथे भु.क्र.२३३ मध्ये २ हेक्टर २४ आर, जमीन भु.क्र.२३१ मध्ये ०.८५ आर, मौजे बाऱ्हाळी ता. मुखेड येथील जमीन भु.क्र.८२४ मध्ये ०.०४ आर आणि मौजे डोंगळीता. मदनुर, जि. कामारेड्डी येथे १० एकर शेतजमीन आहे. सदर जमिनीतून गैरअर्जदार यांना ४ ते ५ लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच अर्जदाराची सासू सुनंदा यांच्या नावाने निडेबन ता. येथील सर्वे नं.२१ मध्ये प्लॉट क्र.०१ज्याचा ग्रा.पं.मि.क्र.१६४८ क्षेत्र १५०५ चौ.फुट हा प्लॉट आहे. तसेच धनेगाव सिडको, नांदेड येथे किराणा मर्चट असोसिएशन येथे प्लॉट क्र.८६ असून सदरचे दुकान हे भाडयाने देण्यात आलेले आहे. सदर दुकानापासून वार्षीक भाडे रुपये १,००,०००/– मिळते. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.४ हा एम.डी. डॉक्टर असून तो महिन्याला ४ ते ५ लाख रुपये कमावितो. गैरअर्जदार क्र.५ ही देखील डॅक्टर असून ती सुध्दा महिन्याला ६० ते ७० हजार रुपये कामविते. गैरअर्जदार क्र.२ हे पेंन्शनर असून त्यांनाही महिला ४० हजार रुपये पेंन्शन मिळते. अर्जदारास गैरअर्जदार क्र.१ ची पोटगी देण्याची ऐपत आहे. याउलट अर्जदार ही घरकाम करीत असल्यामुळे तिला इतर कोणताही कामधंदा येत नसल्यामुळे ती गैरअर्जदार क्र.१ वर अवलंबून आहे. त्यामुळे अर्जदार हिस तिच्या व तिच्या मुलीच्या दैनंदिन गरजा भागवण्यासाठी प्रतिमहा प्रत्येकी १०,०००/– रुपये पोटगी मिळावी म्हणुन सदरचा अर्ज दाखल केला आहे.

६. प्रस्तुतच्या प्रकरणात गैरअर्जदार क्र.१ ते ५ व ७ हे हजर होऊन

त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे **नि.क्र.१३** वर सादर केले आहे. गैरअर्जदारांनी त्यांचे अर्जदारांसोबत असलेले नाते तसेच अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ चे लग्न दिनांक १३.०५.२०१३ रोजी वाढवणा येथे झाल्याचे मान्य करुन इतर सर्व मजकूर नाकारला आहे. त्यांच्या कथनानुसार अर्जदाराच्या आई–वडीलांनी लग्नामध्ये वरदक्षिणा तसेच ११ तोळे सोने दिले नाही. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा शाल अंगठीचा कार्यक्रम साध्या पध्दतीने झालेला असून अर्जदाराच्या वडीलांना ३ लाख रुपये खर्च आलेला आहे. गैरअर्जदारांनी अर्जदारास लग्नाच्या सहा महिन्यानंतर चुकीची वागणूक दिल्याचे तसेच शारिरीक व मानसिक छळ केल्याचे नाकारले आहे. उलट गैरअर्जदार हा अर्जदाराला नेहमी प्रेमाणे व समजून घेऊन राहत असल्याचे व वेळोवेळी विचारपूस करत असल्याचे कथन केले आहे.

७. गैरअर्जदारांच्या कथनानुसार अर्जदार ही बी.ए. पदवीधारक असून तिने डी.एड्. चे देखील शिक्षण घेतले आहे. गैरअर्जदारांनी अर्जदाराकडे १० लाख रुपयाची मागणी केल्याचे कथन नाकारले आहे. उलट ऑगस्ट २०१५ मध्ये रक्षाबंधन सणानिमित्त गैरअर्जदारांनी अर्जदारास माहेरी जाऊन येण्याबद्दल सुचविले असता तिने नकार दिला व माहेरी गेल्यास परत येणार नाही अशी धमकी देऊन विनाकारण वाद केला व स्वतःच्या नातेवाईकांना सासरी बोलावून घेतले. त्यावेळी अर्जदाराच्या वडीलांनी गैरअर्जदारांना शिवीगाळ करुन गैरअर्जदार क्र.१ याचा अपमान केला. तसेच, गैरअर्जदारांवर खोटया केसेस करुन अडकवू अशी धमकी देऊन मुलगी गार्गी हिला घेऊन अर्जदार माच–२०१६ मध्ये तिच्या माहेरी निघून गेली. तेंव्हापासून ती तिच्या माहेरी राहत आहे. गैरअर्जदारांनी वारंवार तिला सासरी आणण्याचा प्रयत्न केला असता, ती आलेली नाही.

८. गैरअर्जदार पुढे कथन करतात की, अर्जदार ही गैरअर्जदार क्र.१ व त्याच्या कुटुंबियांना मुलगी गार्गीचे लाड करायचे असल्यास त्यांच्या नावे असलेली मालमत्ता व प्लॉट स्वतःच्या नावे करुन देण्याचा तगादा लावत असे. तसेच, गैरअर्जदारांचा मानसिक छळ करत असे. सदरील बाब अर्जदाराच्या घरी सांगून देखील तिच्या वागण्यात कुठलाही फरक पडलेला नाही. अर्जदाराला गैरअर्जदार

क्र.१ याच्यासोबत संसार करण्याची ईच्छा नसल्याने तिने गैरअर्जदारांविरुध्द खोटया तक्रारी दाखल केल्या आहेत. अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ कडून फारकतीची मागणी करुन रक्कम रुपये ८० लाख पोटगी पोटी मागितले आहेत. तसेच, मुलगी गार्गीशी कुठलाही संबंध ठेवायचा नाही अशी देखील मागणी केली आहे. अशाप्रकारे अर्जदार ही गैरअर्जदारांची पिळवणूक करण्याचा प्रयत्न करीत आहे. गैरअर्जदारांच्या कथनानुसार अर्जदार ही उच्च शिक्षीत असून स्वतःचे पालनपोषण करु शकते. तसेच ती दहावीच्या वर्गाची शिकवणी देखील घेत असून दरमहा २० हजार रुपये कमावते. अर्जदार क्र.२ ही वॉलीबॉल पट्टू असून तिला दरमहा शासनाकडून १० हजार रुपये मिळतात. त्यामुळे, अर्जदारांना वेगळया पोटगीची कुठलीही गरज नाही. वरील सर्व कारणांवरुन प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती गैरअर्जदारांनी केली आहे.

९. दोन्हीं पक्षांचे कथन, अभिलेखावर दाखल कागदपत्रे व केलल्या युक्तीवादावरुन प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ येतात. सदर मुद्यांवर सुसंगत कारणमिमांसेसह निष्कर्ष नोंदविले, ते खालील प्रमाणे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार ही तिच्यावर गैरअर्जदारांमार्फत प्रथमदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सिध्द करते काय ? | **होय.** |
| २. | अर्जदार हे गैरअर्जदारांकडून दरमहा प्रत्येकी रक्कम रुपये १०,०००/– अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत काय ? | **अंशतः होय. प्रत्येकी दरमहा रक्कम रूपये २,०००/–, गैरअर्जदार क्र.१ याकडून.** |

| | | |
|---|---|---|
| ३. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीताः–</u>**

**१०.** अर्ज व त्यावरील लेखी म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्हीं बाजुंचा सखोल युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षकारांच्या कथनानुसार एक बाब स्पष्ट होते की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे वैवाहिक नाते आजतागायत कायम असून अर्जदार ही लग्नानंतर तिच्या सासरी काही काळासाठी गैरअर्जदारांसोबत कौटुंबिक नातेसंबंधात राहिलेली आहे. अर्जदाराने शपथेवर तिला गैरअर्जदारांकडून कशी वागणुक देण्यात आली याबद्दल कथन केले आहे. लग्नानंतर कांही दिवसांतच गैरअर्जदार हे बेकायदेशिररित्या पैशाची मागणी करुन अर्जदास हिस शारिरीक व मानसिक त्रास देऊ लागले तसेच, तिला उपाशी ठेवणे, तिचा मान सन्मान न करणे व अर्जदाराचे पती शिक्षक असल्याने संचमान्यता अप्रोल काढण्यासाठी माहेरहून रु.१०,००,०००/– घेवून ये असे म्हणून शारिरीक व मानसिक छळ करु लागले असे कथन केले आहे.

**११.** कौटूंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम, २००५ च्या कलम २(क) मध्ये पिडीत व्यक्ती म्हणजे कोण हे सांगितलेले आहे. तसेच कलम ३ मध्ये कौटूंबिक हिंसाचार म्हणजे काय याचे वर्णन केलेले आहे. मुख्यत्वेकरुन, त्यामध्ये पिडीत व्यक्तीचे आरोग्य मानसीक किंवा शारीरीक, तिची सुरक्षितता यांना धोका पोहोचत असेल अशा गोष्टी तसेच तिच्यासोबत शारीरीक, शाब्दीक व भावनिक दुर्व्यवहार केल्या गेल्या असल्याचे कथन इ. गोष्टी येतात. प्रस्तुतच्या अर्जात अर्जदाराने शपथेवर या सर्व गोष्टींचे कथन केले आहे. आजघडीला तिचे कथन अविश्वासहार्य आहे असा कुठलाही प्राथमिक पुरावा अभिलेखावर नाही. कुठलीही विवाहीत स्त्री नव–याला सोडून माहेरी जाऊन राहणार नाही. जेंव्हा तिच्या

जिवास धोका आहे किंवा तिची शारीरीक व मानसिक अवहेलना होत आहे अशा परिस्थितीतच ती सासरचे घर सोडून माहेरी राहु शकते.

१२. प्रस्तुतच्या प्रकरणात गैरअर्जदारांनी प्रतिकथन करुन अर्जदाराचे म्हणणे खोटे असल्याचे सांगण्याचा प्रयत्न केला आहे परंतु अर्जदार ही आज रोजी माहेरी राहत आहे ही बाब त्यांनी मान्य केली आहे. तसेच, तिला परत सासरी आणण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडे अर्ज दाखल करुन कुठलेही प्रयत्न केलेले दिसून येते नाहीत. यावरुन गैरअर्जदार यांनी अर्जदाराला परत सासरी आणण्यासाठी योग्य तजविज घेतली नसल्याचे प्रथमदर्शी सिध्द होत आहे. अशा परिस्थीतीत, अर्जदाराचे कथन जास्त वाजवी वाटत आहे. वरील सर्व कारणांवरुन अर्जदारावर कौटूंबिक हिंसाचार झाला आहे हे प्राथमिकदृष्टया दिसून येत आहे. सबब मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवित आहे.

<u>**मुद्दा क्र.२ करीताः–**</u>

१३. अर्जदार व गैरअर्जदारांनी अनुक्रमे **नि.क्र.२३ व नि.क्र.२४** खाली त्यांचे मालमत्ता व दायित्वाचे शपथपत्र दाखल केले आहे. अर्जदार ही कुठेही नोकरी करत नसल्याचे गैरअर्जदारांना मान्य आहे. परंतु, अर्जदाराने तिचे शिक्षण बी.ए. डी.एड्. झाल्याचे नमूद केले असून तिला घरखर्चापोटी १५ हजार, औषधोपचारासाठी ५ हजार, अर्जदार क्र.२ च्या शिक्षणासाठी १० हजार व प्रवासासाठी १० हजार रुपये दरमहा लागत असल्याचे नमूद केले आहे. त्याचप्रमाणे, सदरील शपथपत्रात तिने दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, बिलोली येथे चालू असलेल्या प्रकरणात तिला गैरअर्जदाराकडून दरमहा ५ हजार रुपये पोटगी देण्याचे न्यायालयाने आदेशित केले असल्याचे नमूद केले आहे. आजपर्यंत त्या प्रकरणात गैरअर्जदाराने ६० हजार रुपये भरल्याचे देखील नमूद केले आहे. तिने तिच्या शपथपत्रात तिच्या नावे कुठलीही चल व अचल मालमत्ता नसल्याचे नमूद केले आहे.

**१४.** याउलट, गैरअर्जदार कैलासपती याने त्याच्या शपथपत्रामध्ये त्याला दरमहा ३० हजार रुपयाचा वैयक्तीक खर्च असल्याचे नमूद करुन त्याच्यावर त्याच्या आई व वडीलांची संपूर्ण जबाबदारी असल्याचे कथन केले आहे. तसेच त्याने त्याच्या नावे एक मोटरसायकल व मौजे सुगाव ता. मुखेड येथे वडिलोपार्जित मिळकत २ हेक्टर २४ आर गट क्र.२३३ मध्ये असल्याचे नमूद केले आहे. गैरअर्जदाराने त्याच्या शपथपत्रात तो नोकरीस असल्याचे मान्य करुन त्यास किती पगार मिळतो हे नमूद केलेले नाही. परंतु, अर्जदारांनी यादी **नि.क्र.२६** खाली गैरअर्जदार क्र.१ कैलासपती याच्या पगारपत्रकाची प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. सदरील पगारपत्रकाचे अवलोकन केले असता, कैलासपती याला सर्व खर्च वजा जाता दरमहा रक्कम रुपये ७६,२१४/– इतके वेतन असल्याचे दिसून येते.

**१५.** गैरअर्जदार यांनी अर्जदार सन २०१८ पासून माहेरी राहत असल्याची बाब मान्य केली आहे. परंतु गैरअर्जदार क्र.१ याने पती या नात्याने आजतागायत अर्जदार व त्यांची मुलगी गार्गी हिच्या पालनपोषणासाठी तसेच इतर खर्चासाठी कुठलीही आर्थीक तरतूद केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदाराचे गैरअर्जदारांसोबत एकत्र राहत असतानाचे जीवनमान, सध्याचे सर्वसाधारण खर्च व महागाई विचारात घेऊन तिला योग्य अंतरिम पोटगी देणे न्यायाचे ठरते. अर्जदार हिला गैरअर्जदार क्र.१ याकडून बिलोली येथे दाखल प्रकरणातून दरमहा ५ हजार रुपये पोटगी मिळत आहे. परंतु आज घडीला तिला स्वतःचे तसेच अर्जदार क्र.२ गार्गी हिचे संगोपण करायचे आहे. सध्याचे शिक्षण महाग झालेले आहे. तसेच, दैनंदिन जिवनासाठी कमीत कमी प्रत्येकाला ९ ते १० हजार रुपये सहजपणे खर्च येतो. परंतु, त्याचप्रमाणे, गैरअर्जदार यावर देखील स्वतःला तसेच त्याच्या वयोवृध्द आई–वडीलांना सांभाळण्याची संपूर्ण जबाबदारी आहे. तरी देखील अर्जदार क्र.१ व २ यांना सांभाळण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ कैलासपती यांची आहे. वरील सर्व बाबींचा विचार केला असता, अर्जदार क्र.१ व २ यांना दरमहा प्रत्येकी २०००/– रुपये पोटगी रक्कम गैरअर्जदार क्र.१ यांनी देणे न्यायाचे व वाजवी ठरेल. सबब, मुद्दा क्र.२ चे निष्कर्ष मी अंशतः होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.३ करीताः–</u>**

**१६.** मुळ अर्ज निकाली काढेपर्यंत बराच वेळ लागू शकतो. मुळ अर्ज दाखल दिनांकापासुन अर्जदार ही प्रकरणाची पैरवी करत आहे. तिला या सर्व गोष्टींसाठी आर्थिक मदत करणे गरजेचे आहे. सबब, अंतरीम पोटगी रक्कम गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार क्र.१ व २ यांना अंतरिम पोटगी अर्ज दाखल दिनांकापासुन देणे न्यायोचीत ठरेल. सबब, मुद्दा क्र.३ करीता मी पुढील प्रमाणे आदेश करीत आहे.

| **आदेश** | |
|---|---|
| **१.** | अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो. |
| **२.** | गैरअर्जदार क्र.१ याने अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासून ते मुळ तक्रार अर्जाचा निकाल लागेपर्यंत अर्जदार क्र.१ व २ यांना प्रत्येकी दरमहा २,०००/– रूपये इतकी अंतरिम पोटगी द्यावी. |
| **३.** | सदर अधिनियमाच्या कलम २४ नुसार प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदार हिला विनामूल्य द्यावी. |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.04.04 17:55:58 +0530

**(एन.जे. चव्हाण)**

उदगीर.                न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

दिनांक– ०४/०४/२०२५.                (न्यायालय क्र.३), उदगीर